

सौभाग्य, संस्कार आणि आनंदाचा अनोखा संगम!

e Paper

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in | गुरुवार दिनांक 20/11/२०२५ | METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन ‖ पिंपरी चिंचवड व पुणे ‖ पान 5 ‖ अंक 272 ‖ RNI - MAHMAR /2021/51259 ‖ metrocity924@gmail.com



# मंत्र्यांना न्याय मिळत नसेल तर राजीनामा द्यावा!

## खासदार सुप्रिया सुळे यांची टीका

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**मुंबई : राज्यातील मंत्र्यांना माझी विनंती आहे, त्यांनी कॅबिनेट बैठकीवर बहिष्कार टाकू नये. जनतेचे प्रश्न, अडचणी सोडविण्यासाठी तुम्ही लोकप्रतिनिधी, मंत्री झाला आहात.**

**त्यामुळे कॅबिनेट बैठकीवर बहिष्कार टाकणे राज्याच्या हिताचे नाही. मंत्री म्हणून तुम्हाला न्याय मिळत नसेल तर, राजीनामा द्या, असा टोला राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या (शरद पवार) कार्याध्यक्षा, खासदार सुप्रिया सुळे यांनी लगावला.**



सत्ताधारी मंत्र्यांनी कॅबिनेट बैठकीवर बहिष्कार टाकू नये. कॅबिनेट बैठकीवर बहिष्कार टाकणे म्हणजे जनतेच्या प्रश्नावर चर्चा न करणे, असा अर्थ होईल. जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी तुम्ही मंत्री झाला आहात. त्यामुळे ज्या कामासाठी मंत्री झाला आहात, ते होत नसेल तर राजीनामा देता येतो. सरकार तुमचे आहे जर तुम्हालाच न्याय मिळत नसेल तर राजीनामा द्या, अशी मागणी सुळे केली.अंमली पदार्थ विरोधातील मोहिमे बदल मी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहिले होते. ड्रग्स प्रकरणात माझ्या भावना कळविण्यासाठी मी मुख्यमंत्र्यांना पत्र लिहिले होते. त्यांनी मला का स्पष्टीकरण दिले आहे, हे मला माहित नाही.लोकसंख्या वाढ, वाहतुकीतील गोंधळ, अंमली पदार्थ प्रकरण, तरुणांची वाढती व्यसनाधीनता आणि प्रशासनातील समन्वयाचा अभाव यामुळे पुण्यात गुन्हेगारीच्या घटना वाढत आहेत. पुणे शहरात कायदा – सुव्यवस्थेचा प्रश्न गंभीर होत चालला आहे. पोलीसांवर प्रचंड ताण आहे. गुन्हे रोखण्यासाठी अधिक व्यवस्थात्मक पावले उचलली पाहिजेत, अशी मागणीही सुळे यांनी केली

# निवडणुकांमुळे पॉलिटेक्निकच्या परीक्षेच्या वेळापत्रकात बदल

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**मुंबई : राज्यात २ डिसेंबर रोजी होणाऱ्या नगरपरिषद आणि नगरपंचायतींच्या निवडणुकांमुळे महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळामार्फत (एमएसबीटीई) घेण्यात येणाऱ्या १ व २ डिसेंबर रोजी होणारी परीक्षेच्या वेळापत्रकात बदल करण्यात आला आहे.**




निवडणुकांसाठी राज्यातील अनेक संस्थांमधील परीक्षा केंद्रे शासकीय कामासाठी वापरण्यात येणार आहेत. त्यामुळे या कालावधीत होणाऱ्या लेखी परीक्षा पूर्वनियोजित वेळापत्रकाप्रमाणे घेणे अशक्य आहे. परिणामी एमएसबीटीईने हिवाळी परीक्षेच्या वेळापत्रकातील दोन दिवसांच्या लेखी परीक्षेच्या वेळत बदल करून सुधारित वेळापत्रक तातडीने संकेतस्थळावर जाहीर केले आहे.राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची रणधुमाळी सुरू झाली आहे. निवडणुकांसाठी राज्यातील विविध शैक्षणिक संस्थांच्या इमारती व वर्ग खोल्या सरकारने ताब्यात घेतल्या आहेत. परिणामी परीक्षांचे नियोजन विस्कळीत होण्याची शक्यता आहे.निवडणुका लक्षात घेऊन निवडणुकीच्या आधीचा दिवस, प्रत्यक्ष मतदानाचा दिवस आणि त्यापुढील एक दिवस अशी तीन दिवस परीक्षा घेणे शक्य नाही. पॉलिटेक्निकच्या वेळापत्रकानुसार १ आणि २ डिसेंबर रोजी परीक्षा नियोजित होती. मात्र निवडणुकीमुळे परीक्षा घेणे शक्य नसल्याने एमएसबीटीईने १ व २ डिसेंबर २०२५ रोजी होणाऱ्या परीक्षा पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला आहे.

# माई समाजाच्या खऱ्या 'यशोदामाई' ठरतात

## कृष्ण प्रकाश यांचे प्रतिपादन

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पुणे : "माईंना मी पहिल्यांदा नांदेड येथे भेटलो. स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठातील त्या कार्यक्रमात त्यांच्या भाषणाने मी अत्यंत प्रभावित झालो. त्यानंतर त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा आणि कार्याचा मी सखोल अभ्यास केला. जीवनात अनेक अडचणी आणि संकटे असतानाही माईंनी कधीही नकारात्मकता अंगीकारली नाही. त्यांच्या कार्याच्या पाठीशी सकारात्मक विचारांची आणि अपार जिद्दीची अमूल्य शक्ती होती.**

त्यांनी अर्जुनाप्रमाणे ध्येयावर लक्ष केंद्रित केले आणि स्वतःचे दुःख विसरून इतरांसाठी आयुष्य अर्पण केले. म्हणूनच त्या समाजाच्या खऱ्या 'यशोदामाई' ठरतात," असे प्रतिपादन अप्पर पोलीस महासंचालक फोर्स वन महाराष्ट्राचे प्रमुख कृष्ण प्रकाश यांनी केले.सप्तसिंधू महिला आधार, बालसंगोपन व शिक्षण संस्था, मांजरी तर्फे पद्मश्री डॉ. सौ. सिंधुताई सपकाळ (माई) यांच्या




'माई दिनदर्शिका -2026' चे प्रकाशन

वाढदिवस व बालदिनाच्या औचित्याने 'माई दिनदर्शिका-2026' चे प्रकाशन करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून कृष्ण प्रकाश बोलत होते. कार्यक्रमास मनिष कासोदेकर (लेटर्स अँड स्पिरिट आर्ट क्लब), 'सप्तसिंधू' महिला आधार, बालसंगोपन व शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा ममता सिंधुताई सपकाळ, ममता बाल सदनचे अध्यक्ष दीपक दादा गायकवाड, दि मदर ग्लोबलचे अध्यक्ष विनय सपकाळ आणि विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.पुढे बोलताना कृष्ण प्रकाश म्हणाले, "सिंधुताई सपकाळ यांनी हजारो अनाथ मुलांचे भवितव्य घडवले. त्यांच्याकडे कोणतेही पद, सत्ता किंवा राजपाट नव्हता; पण समाजासाठी सर्वस्व अर्पण करणाऱ्या आदर्श राजासारखी त्यांची सेवा होती. एका हाताने घेतलेले दुसऱ्या हाताला देत राहण्याचा त्यांचा जीवनमार्ग होता. जसे एका दिव्याने दुसरा दिवा प्रज्वलित होतो, तसे माईंनी हजारो आयुष्ये उजळवली. त्यांच्या प्रेरणेने अनेकजण कार्यरत होतील, याबाबत मला पूर्ण विश्वास आहे."मनिष कासोदेकर म्हणाले, "या 'माई दिनदर्शिका' निमित्त आम्हाला माई परिवाराशी जोडले जाण्याचा आनंद आहे. आम्ही व्यावसायिक हेतू न ठेवता केवळ समाधानासाठी कार्य करत आहोत. ममता ताईंच्या माध्यमातून आम्ही माईंना समजून घेण्याचा प्रयत्न केला. माईंचा विशाल प्रवास केवळ 12 पानांत मांडणे हे मोठे आव्हान होते. माईंचे फोटो सर्वत्र आहेत; पण आम्ही यामध्ये त्यांच्या विचारांचा वेगळा आणि अर्थपूर्ण अनुभव देण्याचा प्रयत्न केला आहे."कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना ममता सपकाळ म्हणाल्या, "माझ्या आईने जे भोगले ते तिच्या नशिबात होते; पण असे प्रसंग कुणाच्याही वाट्याला येऊ नयेत म्हणून ती अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही खंबीरपणे उभी राहिली.

जगातील प्रत्येक अनाथ व्यक्तीपर्यंत पोहोचून त्यांना आधार देण्याचा तीने शेवटपर्यंत प्रयत्न केला. आज माई आपल्यात नसल्या तरी त्यांच्या संस्था आम्ही भावंडे चालवत असून अधिक मोठ्या करत आहोत. त्यामुळे तिचा वाढदिवस आम्हाला 'जयंती' वाटत नाही—कारण संस्था म्हणजेच आमच्या आईचे जिवंत अस्तित्व.

बालदिन आणि माईंचा वाढदिवस यांचा एकाच दिवशी योग येणे हे निश्चितच विशेष आहे."माई पब्लिकेशन च्या वतीने 'माई दिनदर्शिका -2026' प्रकाशित केली असून या दिनदर्शिकेच्या विक्रीतून येणारा संपूर्ण नफा माईंच्या संस्थेतील मुलांच्या शिक्षणासाठी वापरण्यात येणार आहे.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पूजा भडांगे यांनी केले.

# चार नगरसेवक बिनविरोध !

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**तळेगाव दाभाडे : सध्या नगरपरिषद आणि नगरपंचायतीच्या निवडणुका सुरू आहेत. सर्वत्र निवडणुकीचे वातावरण सुरू आहे. दरम्यान, तळेगाव दाभाडे नगर परिषदेमध्ये भाजपचे तीन आणि राष्ट्रवादीचा एक असे चार उमेदवार बिनविरोध निवडून आले आहे.**

या उमेदवारांचे एकच अर्ज आल्याने त्यांची बिनविरोध निवड



निश्चित असून अधिकृत घोषणेची औपचारिकता बाकी आहे.तळेगाव दाभाडे नगरपरिषद निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) आणि भाजपची युती झाली. राष्ट्रवादी काँग्रेस 17 आणि भाजप 11 जागांवर निवडणूक लढवत आहे. तळेगाव दाभाडे मध्ये हे दोन्ही पक्षच मुख्य पक्ष आहेत, त्यामुळे चार प्रभागात प्रतिस्पर्धी उमेदवारांची अर्ज आले नाहीत.

त्यामुळे या चार प्रभागातून चार उमेदवार बिनविरोध निवडून आल्याचे निश्चित आहे.यामध्ये प्रभाग क्रमांक ९ मधून राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाच्या हेमलता खळदे ,प्रभाग क्रमांक 13 मधून भाजपचे दीपक भेगडे ,शोभा परदेशी आणि प्रभाग क्रमांक १ मधील निखिल भगत यांची बिनविरोध निवड निश्चित असून औपचारिकता बाकी आहे.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

गुरुवार दिनांक 20/11/२०२५

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# महानगरपालिकेच्या स्थायी समिती बैठकीत विविध विषयांना मान्यता

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी - पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय इमारतीतील दिवंगत महापौर मधुकर पवळे सभागृहात स्थायी समितीची बैठक संपन्न झाली, बैठकीच्या अध्यक्षस्थानी प्रशासक श्रावण हर्डीकर होते. यावेळी सादर करण्यात आलेल्या विविध विषयांची माहिती घेत आयुक्त श्रावण हर्डीकर यांनी मान्यता दिली व शहरात सुरु असलेल्या विकासकामांचा विभागनिहाय आढावा ही घेतला.**



या बैठकीस अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, तृप्ती सांडभोर,नगरसचिव मुकेश कोळप तसेच विषयाशी संबंधित विभागप्रमुख आणि अधिकारी उपस्थित होते.आज झालेल्या स्थायी समिती बैठकीत दत्तनगर ते वडमुखवाडी ते काटे वस्ती बी आर टी मार्गावरील हमी कालावधी संपलेले एल ई डी दिवे बदलणे, ग व फ क्षेत्रीय विद्युतविभागाचे प्रपत्रात नमूद विकासकामांचे अवलोकन करणे, पशुवैद्यकीय विभागाअंतर्गत तरतूद वर्ग करणे, मे. आवडी महिला बचत गट व मे. गायत्री महिला बचत गट यांचे सामुदायिक व सार्वजनिक शौचालयांचे स्वच्छता व देखभाल दुरुस्ती कामास मुदतवाढ देणे, प्रभाग क्र.३ चऱ्होली अंतर्गत पठारे मळा, पीर दर्गा परिसरातील डीपी रस्त्यावर विद्युत विषयक काम करणे, महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूकीसाठी मतदार याद्यांचे कंट्रोल चार्ट तयार करण्यासाठी संगणक प्रणाली खरेदी करणे, प्रभाग क्र. ११ मधील मथुरा स्वीट ते स्वामी विवेकानंद बॅडमिंटन हॉल पर्यंत स्टोर्म वॉटर लाईन टाकणे व अनुषंगिक कामे करणे, मुख्य लेखापरीक्षक विभागातील कर्मचाऱ्यांच्या रजा मंजूर करणे, मुख्य अग्निशमन केंद्र, संत तुकाराम नगर व नवीन तालेरा रुग्णालय चिंचवड येथे आयपीपी- बीएक्स/ई पीएबीएक्स यंत्रणेसाठी नवीन पी आर आय लाईन घेणे, अर्जित रजा/ सह पूर्णवेतनी परवर्तीत रजा/ अर्ध वेतनी रजा खर्ची टाकून मंजुरी देणे, ह क्षेत्रीय कार्यालय कार्यक्षेत्रातील नवी दिशा. योजना अंतर्गत सामुदायिक व सार्वजनिक शौचालयांच्या स्वच्छता व देखभाल कामकाज थेट पद्धतीने देण्यात आलेल्या कामास मुदतवाढ देणे, क्रांतिगुरू लहुजी वस्ताद साळवे विचार प्रबोधन पर्व आयोजन खर्चास मान्यता देणे, क क्षेत्रीय कार्यलयाअंतर्गत नेहरूनगर स्मशानभूमी मधील विद्युत दाहिनीचे १८ महिन्याकरिता चालन व देखभाल दुरुस्ती करणे, इंद्रप्रभा सोसायटी नवीन झालेल्या डीपी रस्त्याला अडथळा ठरणारे ई एच व्ही टॉवर शिफ्ट करणे, महापालिकेच्या विविध विभागामध्ये इंटरनेट बँडविथ सेवा उपलब्ध करून देणे कामास मुदतवाढ देणे, प्रभाग १८ मधील सार्वजनिक शौचालये व मुत्रालये देखभाल दुरुस्ती करणे व स्थापत्य विषयक कामे करणे, प्रभाग क्र. १८ मधील चिंचवड परिसरात स्थापत्य विषयक देखभाल दुरुस्ती व नागरिकांनी सुचविलेली स्थापत्य विषयक कामे करणे, प्रभाग क्र ३० मधील फुगेवाडी व कासारवाडी मधील विविध भागातील मनपाच्या कार्यक्रमांसाठी मंडप व्यवस्था पुरविणे व फर्निचर साहित्य पुरविणे,

प्रभाग क्र. २० येथे महापालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी मंडप व्यवस्था करणे व इतर अनुषंगिक कामे करणे, कासारवाडी स्तरावर किरकोळ दुरुस्तीची व देखभाल कामे करणे, महापालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी स्वीप उपक्रम राबविणे व येणाऱ्या खर्चास मान्यता देणे, महापालिकेतील मैलाशुद्धीकरण केंद्र व पंपिंग स्टेशन मधील सिमाभिंतीची देखभाल व दुरुस्तीचे कामकाज करणे, महापालिकेतील मैला शुद्धीकरण केंद्रामध्ये स्थापत्य विषयक कामे करणे आदि विषयांना आयुक्त श्रावण हर्डीकर यांनी मान्यता दिली.

# किरकोळ कारणावरून महिलेचा खून

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पुण्यातील येरवडा परिसरात महिलांना दांडक्याने बेदम मारहाण करून तिचा दोघांनी मिळून खून केल्याची घटना घडली. आरोपींनी मृतदेह दोन ते तीन दिवस घरात ठेवून दुर्गंधी सुटल्यानंतर कचरापेटी टाकल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी येरवडा पोलिसांनी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.सुवर्णा (वय ४०) असे खून झालेल्या महिलेचे नाव आहे.**




तर रवी रमेश साबळे (वय ३५) त्याचे वडील रमेश रामचंद्र साबळे (वय ६५, दोघेही रा. जिजामाता नगर, नवी खडकी, येरवडा) यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष शिंदे यांनी फिर्याद दिली आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी रवी साबळे याची सुवर्णा नावाच्या महिलेची काही दिवसांपूर्वी पुणे स्टेशन परिसरात ओळख झाली होती. १५ नोव्हेंबर रोजी तिला पुणे स्टेशन परिसरातून त्याने येरवडातील घरी आणले, किरकोळ कारणावरून रवीचा तिच्याशी वाद झाला.

त्यानंतर रवी आणि त्याचे वडील रमेश यांनी तिला घरात लाकडी दांडक्याने बेदम मारहाण केली. मारहाणीत ती गंभीर जखमी झाली, गंभीर जखमी झालेल्या सुवर्णाला दोघांनी रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले नाही. त्यानंतर तिचा मृत्यू झाल्याचे समजल्यानंतर दोघांनी दोन ते तीन दिवस मृतदेह घरात ठेवला. मृतदेह घरात ठेवल्यानंतर दुर्गंधी सुटली.

आरोपींनी तिचा मृतदेहाची विल्हेवाट लावून पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केला, तिचा मृतदेह चादरीत गुंडाळून रिक्षातून लोहगाव-वाघोली रस्त्यावरील स्मशानभूमी परिसरात नेला. त्यानंतर या भागातील मोकळ्या जागेतील कचरापेटीत तिचा मृतदेह आरोपींनी टाकला.

मंगळवारी १८ नोव्हेंबर रोजी लोहगाव-वाघोली रस्त्यावर एका महिलेचा मृतदेह सापडल्याची माहिती पोलिसांना मिळाली, त्यानंतर पोलिसांनी तपास सुरू केल्यानंतर आरोपी रवी साबळे आणि त्याचे वडील रमेश यांनी सुवर्णाचा किरकोळ वादातून बेदम मारहाण करून खून केल्याची घटना समोर आली. याबाबत अधिक तपास गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विजय ठाकर करीत आहेत.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

गुरुवार दिनांक 20/11/२०२५

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# सौभाग्य, संस्कार आणि आनंदाचा अनोखा संगम!

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**‘होम मिनिस्टर खेळ पैठणीचा’ या आगळ्या वेगळ्या कार्यक्रमात सौभाग्य, संस्कार आणि आनंद यांचा सुंदर मिलाफ अनुभवायला मिळाला. आमदार अमित गोरखे यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्यानिमित्त श्रीमती अनुराधाताई गोरखे आणि हम पाच ग्रुप यांच्या संयोजनातून हा भव्य कार्यक्रम राजश्री शाहू क्रीडांगण, शाहूनगर, चिंचवड येथे काल उत्साहात पार पडला.**

**या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बी के कोकाटे आणि प्रसिद्ध अभिनेता ओम यादव यांनी केले या कार्यक्रमाला 4000 पेक्षा जास्त महिलांनी सहभाग घेतला व शेकडो महिलांनी बक्षिसे जिंकली.**



शाहू नगर, संभाजी नगर, दत्तनगर, मोरवाडी,म्हाडा विद्यानगर व आसपासच्या परिसरातील माता-भगिनींनी या उपक्रमात मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. घर सांभाळणाऱ्या, समाज घडविणाऱ्या आणि आपल्या प्रत्येक क्षणात प्रेमाची उब देणाऱ्या गृहिणींसाठी खास आयोजित केलेल्या या कार्यक्रमास नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.कार्यक्रमात महिलांसाठी विविध मनोरंजक खेळांचे आयोजन करण्यात आले होते. सहभागी महिलांनी आपली कल्पकता, उत्साह आणि कौशल्यांचे सुंदर दर्शन घडवले. हास्य, स्पर्धा आणि आनंदाचा जल्लोष अनुभवत अनेकांनी आकर्षक बक्षिसेही जिंकली. या कार्यक्रमात पहिल्या विजेत्यांना सोन्याचा हार देण्यात आला, तर तीन विजेत्यांना ई-व्हेईकल, टीव्ही, वॉशिंग मशीन, रेफ्रिजरेटर, पैठणी यांसारखी शेकडो बक्षिसे देऊन गौरविण्यात आले. महिलांच्या हातात घर, समाज आणि संस्कार आहे, आणि आज त्या हातांनी आनंदाचा उत्सव रंगवला हे या कार्यक्रमातून प्रकर्षाने जाणवले.या प्रसंगी आमदार सौ. उमाताई खापरे, सुप्रिया चांदगुडे, सोनाली हिंगे, दीपाली करंजकर, रोहिणी रासकर, मा नगरसेविका शर्मिला बाबर, मा नगरसेविका कमल घोलप, रेश्मा बाबर, प्रतिभा जेउरकर, प्रतिभा जवळकर ,वैशाली खाडेय, पिंपरी-चिंचवड भाजप शहराध्यक्ष माननीय शत्रुघ्न काटे, तसेच माजीनगरसेवक विजय (उर्फ शितल) शिंदे, राजू दुर्गे, गणेश लंगोटे, पंकज दलाल, संभाजी नाईकनवरे, राजेंद्र बाबर, रघुनाथ जवळकर, राजेश पिल्ले, बापू घोलप, विनायक मोहिते, राजेश बाबर, अतुल इनामदार, अजित भालेराव, राहुल गावडे, योगेश बाबर आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडल्याबद्दल आयोजक श्रीमती अनुराधाताई गोरखे यांनी सर्व सहभागी महिलांचे, पाहुण्यांचे आणि स्थानिक नागरिकांचे मन:पूर्वक आभार मानले.

# लिफ्ट’ घेऊन केलेला प्रवास ठरला अखेरचा

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी : शिक्रापूर-चाकण रस्त्यावर टेम्पोने दुचाकीला धडक दिली. या अपघातात ६५ वर्षीय महिलेचा मृत्यू झाला. ही महिला दुचाकी चालकाकडे लिफ्ट मागून प्रवास करत होती. महिलेचा हा प्रवास अखेरचा ठरला. हा अपघात शिक्रापूर चाकण रोड, साबळेवाडी येथे घडला.सिंधुबाई पांडुरंग शेळके (६५) असे मृत्यू झालेल्या महिलेचे नाव आहे.**




या प्रकरणी त्यांच्या जावयाने चाकण पोलीस ठाण्यामध्ये फिर्याद दिली आहे. त्यानुसार टेम्पो चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी यांची सासू सिंधुबाई शेळके या एका अनोळखी दुचाकी चालकाकडून लिफ्ट घेऊन शिक्रापूरकडून चाकणकडे जात होत्या. याचवेळी साबळेवाडी येथे पाठीमागून आलेल्या टेम्पोने दुचाकीला जोरात धडक दिली.

या धडकेमुळे फिर्यादी यांच्या सासू रस्त्यावर पडल्या. त्यातच त्यांचा मृत्यू झाला. अपघातानंतर त्यांना उपचारासाठी न नेता चालक घटनास्थळावरून पळून गेला. चाकण पोलीस तपास करत आहेत.

या प्रकरणी सुरेश शांताराम चव्हाण (३२, पारध, यवतमाळ) यांनी चाकण पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. अक्षय सुभाष पवार (२६, खराबवाडी, खेड. मूळ रा. नाशिक) याला अटक केली आहे. त्याच्या साथीदाराविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 8999948968

# मेट्रो सिटी
## आयकॉन अवॉर्ड २०२५

METRO CITY ICON
AWARD 2025

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत वर्धापन दिन निमित्त

# पुरस्कार सोहळा २०२५

वर्ष तिसरे मे

सामाजिक,शैक्षणिक,राजकीय,वैद्यकीय, व्यावसायिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींना मेट्रोसिटी आयकॉन अवॉर्ड देऊन सन्मानित करण्यात येत आहे.

रविवार दिनांक 7 डिसेंबर 2025 रोजी सकाळी 11 वाजता
स्थळ : ग.दि. माडगूळकर नाट्यगृह (मिनी ऑडिटेरियम) आकुर्डी पिं.चिं.शहर

– आयोजक –

## शबनम न्यूज मिडिया ग्रुप

शबनम न्यूज | दैनिक मेट्रोसिटी वृत्तांत | सिटीझन मीडिया | सनशाईन ग्राफिक्स

अधिक माहिती साठी संपर्क : 7218327321 / 7620889734